MHJN030014562018

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०५ | ०५ | २०१८ |
| नोंदणी दिनांक | : | ०७ | ०५ | २०१८ |
| निकाल दिनांक | : | ०७ | ०५ | २०२६ |
| कालावधी | : | ०८<br>वर्षे | ००<br>महिने | ०२<br>दिवस |

## मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी– सि. म. पाडोळीकर)

**नियमित फौजदारी खटला क्र.२५८/२०१८** **निशाणी क्र.९०**

(प्रथम खबर अहवाल क्रमांक –४७८/२०१७)

(अपराध कलम – भा.दं.वि चे कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४ व ५०४ सह कलम १४९ प्रमाणे शिक्षेस पात्र, पोलिस ठाणे – कदिम जालना)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलिस ठाणे अंमलदार,
कदिम जालना, ता. जि. जालना. **.. अभियोगपक्ष**

विरुध्द

१. देवचंद रामचंद चौधरी (मयत) ,
२. संतोष गंगाधर माधोवाले,
वयः ४२ वर्षे,
३. किशोर रामचंद चौधरी (मयत),
४. आनंद कचरु चौधरी,
वयः ३४ वर्षे,
५. उमेश नेमिचंद बेनिवाले,
वयः ३२ वर्षे,
६. निलेश नेमिचंद बेनिवाले,
वयः २५ वर्षे,

७. अनिल रुपचंद पारे,
वयः ३५ वर्षे,
आरोपी क्र.२, ४, ५ व ६ रा. काद्राबाद,
ता. जि. जालना.
आरोपी क्र.७ रा. बरवाल गल्ली जालना,
ता. जि. जालना. **.. आरोपी**

सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. डी. राठोड.
आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. जी. एम. जक्कलवार.

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | २५.११.२०१७ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २६.११.२०१७ |
| दोषारोपपत्र दिनांक | ०५.०५.२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | १३.१०.२०२२ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | १३.१०.२०२२ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | --------- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०७.०५.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | संतोष | ०४.१२.२०१७ | ०४.१२.२०१७ | भा.दं.वि चे कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४ व ५०४ सह कलम १४९ प्रमाणे. | निर्दोष | निरंक | -- |
| ४. | आनंद | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| ५. | उमेश | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, |

मुख्य न्यायदंडाधिकारी
दि. ०७.०५.२०२६

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | निलेश | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| ७. | अनिल | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, |

अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.–१ | रमेश रामचंद्र चौधरी (नि.क्र.३९) | फिर्यादी |
| अ.सा.–२ | सुशिल नंदकिशोर चित्राल (नि.क्र.४२) | पंच साक्षीदार |
| अ.सा.–३ | गणेश धुलीचंद चौधरी (नि.क्र.४७) | पंच साक्षीदार |
| अ.सा.–४ | व्यंकटेश गंगाधर चित्राल (नि.क्र.५३) | पंच साक्षीदार |
| अ.सा.–५ | अमरचंद रमेश चौधरी (नि.क्र.५७) | साक्षीदार |
| अ.सा.–६ | गोपाल रमेश चौधरी (नि.क्र.५८) | साक्षीदार |
| अ.सा.–७ | मोहम्मद नसीर मोहम्मद नजीर (नि.क्र.६१) | पंच साक्षीदार |
| अ.सा.–८ | डॉ. आशीष उत्तमराव राठोड (नि.क्र.६३) | वैद्यकीय अधिकारी |
| अ.सा.–९ | कैलास हरिपंडीत मोहिते (नि.क्र.७७) | तपास अधिकारी |

ब. आरोपींच्या साक्षीदारांची यादी :–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

क. न्यायालयीन साक्षीदार :–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

निशाणी क्रमांकाची यादी :-

अ. अभियोगपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | नि.क्र.४० | फिर्याद |
| ०२ | नि.क्र.६४ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ०३ | नि.क्र.७८ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४ | नि.क्र.७९ ते ८१ | जप्ती पंचनामा |

ब. बचावपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

क. न्यायालयीन निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | २६ | दोषारोप |

ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| - | - | तीन वेळुच्या काठया. |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ०७.०५.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कायदा कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४ व ५०४ सह कलम १४९ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

०२. थोडक्यात अभियोगपक्षाची हकीकत अशी की, दि.२५.११.२०१७ रोजी रात्री फिर्यादी जेवण करुन त्याच्या घरासमोर बसलेला असतांना देवचंद रामचंद चौधरी आणि त्याचा जावई संतोष गंगाराम माधोवाले, किशोर रामचंद चौधरी, आनंद कचरु चौधरी, उमेश नेमिचंद बेनिवाले, निलेश नेमिचंद बेनिवाले व अनिल रुपचंद पारे यांनी हातात लाठया काठया घेऊन शिवीगाळ करत फिर्यादीला मारहाण केली. देवचंद चौधरी म्हणाला की, 'प्लॉट के बारेमे क्यों धमक्या देरा'. तेंव्हा त्याचा जावई संतोष माधोवाले याने फिर्यादीच्या तोंडावर फाईट मारुन फिर्यादीचे तीन दात पाडले. इतरांनी फिर्यादीला लाठया काठयांनी मारहाण केल्यामुळे फिर्यादीची उजव्या पायाची नळगी फुट्रुन रक्त वाहु लागले व फिर्यादीच्या शरिरावर इतरत्र जखमा झाल्या. त्यावेळेस फिर्यादीचा मुलगा नामे गोपाल चौधरी व अमर चौधरी व इतर बरेच लोक जमा झाले होते. फिर्यादी खाली पडल्यावर राहुल चौधरी याने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. संतोष माधोवाले हा फिर्यादीच्या खिशातील खाली पडलेला मोबाईल व नगदी ₹११००/– घेऊन गेला. त्यानंतर फिर्यादीने फिर्याद दाखल केली.

०३. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अंमलदार कदिम जालना यांनी गुन्हा क्रमांक ४७८/२०१७ नोंदविला व गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री. के. एच. मोहिते यांना दिला. त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळाला भेट देऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले.

साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवुन आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

०४. माझे पुर्व पीठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२६ अन्वये भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४ व ५०४ सह कलम १४९ अन्वये दोषारोप निश्चीत केले. सदर दोषारोप आरोपींना वाचुन व समजावुन सांगितले असता आरोपींनी गुन्हा अमान्य करुन संपरिक्षा करण्याची विनंती केली.

०५. सदरील प्रकरणाच्या योग्य निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी खालील मुद्दे विचारात निघतात व खालील नमुद कारणांसहित निष्कर्ष नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवली ? | : | नाही. |
| ०२. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवून दंगल घडवली ? | : | नाही. |
| ०३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवली त्यावेळी त्यांच्याजवळ प्राणघातक शस्त्र होते ? | : | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ०४. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवून तुम्ही आरोपी क्र.२ संतोष याने फिर्यादीच्या तोंडावर फाईट मारुन फिर्यादीचे दात पाडुन इच्छापुर्वक दुखापत केली ? | : नाही. |
| ०५. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवून फिर्यादीस काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत केली ? | : नाही. |
| ०६. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवून फिर्यादीस शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले व अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा अपराध घडावा असे कृत्य केले? | : नाही. |
| ०७. | आदेश कोणता ? | : आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## कारणमिमांसा

०६. आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे नऊ साक्षीदार तपासण्यात आले. निशाणी क्रमांक १ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपींचा फौजदारी

प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नि.क्र.८५ ते ८९ वर नोंदविण्यात आला असता खोटी केस केल्याचा बचाव आरोपींनी घेतला आहे.

०७. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. डी. राठोड व आरोपींचे विधिज्ञ श्री. जी. एम. जक्कलवार यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ ते ७ करीता :**

०८. मुद्दा क्रमांक १ ते ६ एकमेकांशी संलग्न व मिळते जुळते असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत चर्चेस विचाराधीन घेण्यात येत आहेत. अभिलेखावरुन असे दिसून येते की, जागेवरुन फिर्यादी व त्यांच्या भावामध्ये वाद सुरु असून आरोपी क्र.१ व ३ हे फिर्यादीचे भाऊ आहेत. फिर्यादीने अशी साक्ष दिली की, जागेच्या वादावरुन आरोपींनी त्यांना लाठ्या–काठ्याने मारहाण केली व आरोपी क्र.२ याने तोंडावर बुक्का मारुन तीन दात पाडले तसेच डाव्या हाताच्या अंगठा मोडला. सदर मारहाणीमध्ये फिर्यादीचा मोबाईल खाली पडला असता, व आरोपी क्र.२ घेऊन गेला. त्यानंतर फिर्यादीने फिर्याद दाखल केली. फिर्याद नि.क्र. ४० चे अवलोकन करता, आरोपी क्र.२ याने डाव्या हाताचा अंगठा मोडला असे कोठेही नमूद नाही. तसेच आरोपीने केलेल्या मारहाणीमुळे फिर्यादीच्या उजव्या पायाची नळगी फुटून रक्त निघाले, असे फिर्यादीने सरतपासात सांगितलेले नाही, यावरुन फिर्यादमधील कथने व फिर्यादी यांची साक्ष यामध्ये विसंगती असल्याचे स्पष्ट दिसून येते.

०९. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे, आरोपींनी त्यांना काठ्यांनी मारहाण केली, परंतू जप्त तीन काठ्या त्या नसल्याचे फिर्यादीने सांगितले. त्यामुळे जप्त काठ्यांनी फिर्यादीस मारहाण झाली, असा निष्कर्ष काढता येणार नाही. फिर्यादीच्या साक्षीमध्ये असलेली विसंगती तसेच फिर्यादीने काही बाबी सरतपासात अतिरीक्त सांगितलेल्या असल्याने फिर्यादीच्या साक्षीवर पुर्णपणे विसंबून राहता येणार नाही.

१०. फिर्यादीचे मुले अमरचंद व गोपाल यांनी अशी साक्ष दिली, दिनांक २५.११.२०१७ रोजी आरोपींनी त्यांना मारहाण केली होती. त्यांचे साक्षीवरुन असे दिसून येते की, प्रस्तुत घटनेबाबत त्यांना फिर्यादीकडून समजले. आरोपींनी फिर्यादीला मारहाण केल्याचे आरोपी क्र.२ ने फिर्यादीच्या तोंडावर पाईम मारुन दात पाडल्याचे सदर साक्षीदार यांनी सांगितले असले तरीही त्यांची साक्ष ही ऐकीव माहितीच्या आधारे असल्याने व त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नसल्याने ग्राह्या धरता येणार नाही. सबब, सदर दोन्ही साक्षीदारांची साक्ष आरोपींवरील गुन्हा सिध्द करणे करिता उपयुक्त ठरणार नाही.

११. फिर्यादीने अशी साक्ष दिली की आरोपी क्र.२ संतोष याने डाव्या हाताचा अंगठा मोडून अस्थिभंग झाला. परंतु डॉ. राठोड यांनी अशी साक्ष दिली की, दिनांक २६.११.२०१७ रोजी त्यांनी फिर्यादीस तपासले असता, फिर्यादीच्या उजव्या मनगटावर, डाव्या हातावर व पायावर, उजव्या गुडघ्यावर व पायावर जखमा आढळून आल्या. फिर्यादीच्या डाव्या हाताचा अंगठा मोडून अस्थिभंग झाल्याचे डॉक्टरांनी कथन

केलेले नाही. यावरुन तोंडी पुरावा व वैद्यकीय पुरावा यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते. वर उल्लेख केल्याप्रमाणे फिर्यादीच्या मुलांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. फिर्यादीच्या साक्षीमध्ये देखील विसंगती असल्याने व आरोपीने फिर्यादीस मारहाण केली, यास दुजोरा देणारा इतर कोणताही स्वतंत्र पुरावा अभिलेखावर नसल्याने आरोपींनी फिर्यादीस काठ्याने मारहाण करुन आरोपी क्र.२ ने याने तोंडावर बुक्का मारुन दात पाडले, हे सिध्द झाले असे म्हणता येणार नाही.

१२. तपासी अंमलदार यांच्या साक्षीप्रमाणे त्यांनी फिर्यादीचा जबाब घेतला व जबाबावरुन गुन्ह्याची नोंद केली. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र.७८ केला. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेल्या तीन वेळुच्या काठ्या काढ्न दिल्याने त्या जप्ती पंचनामे नि.क्र.७९ ते ८१ ने जप्त केल्या. परंतु घटनास्थळ पंचनामा वरील पंच तसेच तीन जप्ती पंचनामा वरील पंच यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली परंतु त्यातील मजकुर माहिती नसल्याचे सांगितले. पंच साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्याने त्यांचा उलटतपास घेण्यात आला परंतु कोणतीही उपयुक्त बाब समोर आली नाही. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केल्याचे व वेळुच्या काठया जप्त केल्याचे नाकारले आहे. तसेच वर उल्लेख केल्याप्रमाणे जप्त काठ्या गुन्ह्यात वापरलेल्या नाहीत, असे फिर्यादीने सांगितल्याने जप्ती संशयास्पद वाटते. त्यामुळे फक्त तपासी अंमलदार यांच्या साक्षीवरुन घटनास्थळ व जप्ती सिध्द झाली असे म्हणता येणार नाही.

१३. सबब, उपलब्ध पुराव्यावरुन फिर्यादीला जखमा झाल्याचे दिसून असले तरीही सदरच्या जखमा आरोपींनी काठ्याने मारहाण केल्यामुळे झाल्या, हे अभियोगपक्ष संशयापलिकडे जाऊन सिध्द करु शकलेले नाही. सबब, आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायद्येशीर मंडळी जमवून फिर्यादीला काठीने मारहाण करुन गंभीर दुखापत केल्याचे, आरोपी क्र.२ संतोष याने फिर्यादीच्या तोंडावर फाईट मारुन फिर्यादीचे दात पाडुन इच्छापुर्वक दुखापत केल्याचे व शिवीगाळ केल्याचे सिध्द होत नसल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ७ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आदेश

१. आरोपी क्र.२. संतोष गंगाधर माधोवाले, ४. आनंद कचरु चौधरी, ५. उमेश नेमिचंद बेनिवाले, ६. निलेश नेमिचंद बेनिवाले, ७. अनिल रुपचंद पारे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४ व ५०४ चे गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमाल तीन वेळुच्या काठ्या अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात याव्यात.

मुख्य न्यायदंडाधिकारी
दि. ०७.०५.२०२६

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम ₹७५००/– चे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र सादर करावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायदानकक्षात घोषित करण्यात आला.

Digitally signed by SEEMA MAHADEVRAO PADOLIKAR
Date: 2026.05.07 15:41:45 +0530

दिनांकः ०७.०५.२०२६

(सि. म. पाडोळीकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी. डी. एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :– यशवंत दा. वाघ
न्यायालयाचे नाव :– मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, जालना
अपलोड दिनांक :– ०७.०५.२०२६

स्वाक्षरीत/-
लघुलेखक

मुख्य न्यायदंडाधिकारी
दि. ०७.०५.२०२६